3 व-२

जिल्हा परिषद, लातूर.
आवक - टपाल क्र. ..........
विभाग प. सं.
दिनांक 30 NOV 2010
अधि. क. उप मु.का.अ. (सा.)
मु.का.अ. / अति. मु.का.अ.

**जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत (सर्वसाधारण योजना)**
**कामधेनू दत्तक ग्राम ही योजना राबविण्यास**
**प्रशासकीय मंजूरी प्रदान करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभाग
शासन निर्णय क्रमांक: नापुसो-२०१०/प्र.क्र.५०/पदुम-४
मंत्रालय, मुंबई ४०००३२
दिनांक : २९ ऑक्टोबर, २०१०

शासन निर्णय -

जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत (सर्वसाधारण योजना) कामधेनू दत्तक ग्राम योजना सन २०१०-११ पासून राज्यात राबविण्यासाठी सदर योजनेस याद्वारे शासनाची प्रशासकीय मंजूरी प्रदान करण्यात येत आहे.

या योजने अंतर्गत जनावरांना जंतनाशक औषधी पाजणे, गोचिड-गोमाशा निर्मुलन कार्यक्रम, निकृष्ठ चारा सकस करण्यासाठी प्रात्यक्षिकांचे आयोजन, दुग्ध स्पर्धांचे आयोजन, लसीकरण शिबीर, वंध्यत्व निवारण शिबीरे, रक्तजल व रोग नमुने तपासणी इ. कार्यक्रम एकत्रितरित्या दत्तक गावामध्ये मोहिम स्वरूपात राबविण्यात यावेत.

१. **दत्तक ग्रामाची निवड पुढील निकषानुसार करण्यात यावी.**

१. निवड करावयाचे दत्तक ग्राम अस्तित्वातील अथवा प्रस्तावित दुध संकलन केंद्राचे (खाजगी डेअरी/सहकारी दुध संस्था/शासकीय दुध संस्था इत्यादी मार्फत संचलित) मार्गावरील असावे.

२. सदर दत्तक ग्रामामध्ये पैदासक्षम गाई/म्हशींची संख्या किमान ३०० असावी.

३. पशुवैद्यकीय संस्थांच्या कार्यक्षेत्रांतील ज्या गावांमध्ये दुधाळ जनावरांची संख्या सर्वात जास्त असेल त्या गावाची प्राधान्याने निवड करावी.

४. गावांचे सरपंच व ग्राम सेवक तसेच दुध संकलन केंद्र/सहकारी दुग्ध संस्थांचे पदाधिकारी यांचा सक्रिय सहभाग मिळत असलेल्या गावांना प्राधान्य देण्यात यावे.

५. पहिल्या टप्प्यामध्ये योजने अंतर्गत प्रत्येक राज्यस्तरीय व स्थानिकस्तरीय श्रेणी-१ पशुवैद्यकीय दवाखान्यांच्या, तालुका लघु पशुचिकित्सालयाच्या व जिल्हा पशुसर्व चिकित्सालयाच्या कार्यक्षेत्रातील एका ग्रामाची दत्तक ग्राम म्हणून निवड करावी. तथापि, अशी निवड उपलब्ध निधीच्या अधिन राहून करण्यात यावी

६. सदर योजनेचे जिल्हा पातळीवर खालील समितीद्वारे सनियंत्रण करण्यात यावे. त्याचप्रमाणे योजनेच्या अंमलबजावणीसाठी दत्तक ग्रामाची निवडही सदरच्या सनियंत्रण समितीकडून करण्यात यावी.

| | | |
|---|---|---|
| १. जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त | - | अध्यक्ष |
| २. जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद | - | सदस्य |
| ३. जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी | - | सदस्य |
| ४. सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय | - | सदस्य सचिव |

जिल्हा परिषद, लातूर
पशुसंवर्धन विभाग
कार्यासन :- ०४
दिनांक :- ५/१२/१०
अ.का.अ. प.वि.अ. जि.प.स.अ. अति.मु.का.अ.

२. **योजनेच्या अंमलबजावणीची रूपरेषा :-**

**कार्यवाहीचा टप्पा क्र.१ अद्ययावत पशुगणना** - निवडलेल्या दत्तक गावामध्ये दुधात असलेल्या व भाकड संकरित गायी/म्हशींची/देशी-गावठी गायी-म्हशींची अद्ययावत गणना करण्यात यावी. ही गणना करताना शेतकरी/पशुपालक निहाय गणना करून दुग्धोत्पादनातील सर्व गाई-म्हशींच्या दुग्धोत्पादनाची प्रत्येक दुधाळ जनावरनिहाय विहित नमुन्यामध्ये व्यवस्थित नोंद करावी. हे सर्वेक्षण संबंधित गावातील/नजिकच्या पशुवैद्यकीय दवाखान्यावरील पशुसंवर्धन कर्मचाऱ्याने/पविअ यांनी करावे. तसेच सदर गावातील गाई-म्हशींच्या लैंगिक आरोग्य स्थितीबाबतही सदर सर्वेक्षणामध्ये प्राथमिक अंदाज घेण्यात यावा.

**कार्यवाहीचा टप्पा क्र.२ विशेष सभा/ग्रामसभेचे आयोजन** - निवडलेल्या गावामध्ये विशेष सभा/ग्रामसभेचे आयोजन करून स्थानिक पशुपालक/शेतकऱ्यांना योजनेबाबतची सविस्तर माहिती देण्यात यावी. याच सभेच्या वेळी पशुपालकांना योजनेमध्ये जी शिबीरे/कार्यमोहिमा आयोजित करण्यात येणार आहेत, त्याबाबतचे वेळापत्रक/Time Schedule सांगण्यात यावे व सदर वेळापत्रक ग्राम पंचायतीच्या सूचना फलकावर लावावे

९/१२/१०

जेणेकरून ते सहजपणे सर्व ग्रामस्थांच्या नजरेस येईल व कार्यमोहिमा/शिबीरांचे वेळापत्रक त्याच स्वरूपात नमूद असावे, आवश्यकता भासल्यास होर्डिंग/बॅनर देखील सदर गावात योग्य ठिकाणी लावण्यात यावेत. याच सभेच्या वेळी स्थानिक पशुपालक, दुध संकलन केंद्र, सहकारी दुध संस्था यांचा नेमका कशाप्रकारे सहभाग या योजनेमध्ये मिळणे आवश्यक आहे, त्याबाबत स्पष्ट कल्पना त्यांना देवून सहकार्य करण्याबाबत व सहभागी होण्यासाठी आवाहन करावे.

कार्यवाहीचा टप्पा क्र.३ **जंतनाशक औषधे पाजणे/जंतनिर्मुलनासाठी शिबीराचे आयोजन** - गावातील सर्व जनावरांना (गाई, म्हशी, बैल, रेडे, वासरे, पारड्या इत्यादी) पूर्वनियोजित दिनांकास जंतनिर्मुलन शिबीराचे आयोजन करून जंतनाशक औषधे पाजणे, आवश्यकतेनुसार जंतनाशक औषधे inject करणे ही कार्यवाही करावी. शक्यतो सर्वच जनावरांना जंतनाशके दिली जातील याची खात्री करावी. या शिबीराचे वेळी रेंडम पध्दतीने जनावरांचे शेण-नमुने प्रयोगशाळा तपासणीसाठी गोळा करून नंतर त्यांची पशुवैद्यकीय दवाखान्यात तपासणी करावी व या निदानानुसार योग्य औषधोपचार करण्यात यावा.

कार्यवाहीचा टप्पा क्र.४ **गोचिड-गोमाशा (बाह्यकिटक) निर्मुलन शिबीराचे आयोजन** - जंतनाशक औषधे पाजणे शिबीर आयोजित केल्यानंतर एक आठवड्याच्या अंतराने पूर्वनियोजित दिनांकास सदर गावामध्ये जनावरांच्या अंगावरील तसेच गोठ्यांमधील गोचिड/गोमाशा व अन्य बाह्य कीटकांचे निर्मुलन करण्यासाठी शिबीर आयोजित करण्यात यावे. या शिबीरामध्ये गावातील सर्व जनावरांचा सहभाग राहील. तसेच सर्व गोठ्यांचा समावेश केला जाईल याची निश्चिती करावी. या शिबीरामध्ये जनावरांवर तसेच पशुपालकांकडील गोठ्यांमध्ये गोचिड/गोमाशांचे निर्मुलनासाठी औषधांची फवारणी करावी.

कार्यवाहीचा टप्पा क्र.५ **रोगप्रतिबंधक लसीकरण कार्यक्रम मोहिम (Mission Mode) स्वरूपात घेणे** - पूर्व नियोजित दिनांकास सदर गावातील जनावरांना आवश्यकतेनुसार घटसर्प, फऱ्या, आंत्रविषार, लाळ-खुरकुत इत्यादी संसर्गजन्य रोगप्रतिबंधक लसीकरणाचा कार्यक्रम घेण्यात यावा आणि त्याच्या योग्य त्या नोंदी ठेवण्यात याव्यात.

कार्यवाहीचा टप्पा क्र.६ पहिल्या **वंध्यत्व निवारण शिबीरांचे आयोजन करणे** - गोचिड/गोमाशा निर्मुलन शिबीर घेतल्यानंतर ८ दिवसांच्या आत सदर गावामध्ये पहिले वंध्यत्व निवारण शिबीर पूर्वनियोजित दिनांकास घेण्यात यावे व त्यामध्ये सहभागी होणाऱ्या प्रत्येक गायी/म्हशींची तपासणी करून त्याबाबतच्या सर्व आवश्यक नोंदी ठेवण्यात याव्यात. तपासणी आणि प्रत्यक्ष लक्षणावरून निदान केल्यानंतर आवश्यक तो औषधोपचार करण्यात यावा. त्याचप्रमाणे शिबीरात आलेल्या जनावरांचे रक्तजल नमुने, शेणनमुने, गर्भाशयातील स्त्राव इत्यादी नमुने प्रयोगशाळा तपासणीसाठी घेण्यात यावेत. अशा नमुन्यांवरून जनावरांमधील हिमोग्लोबिनची, कॅल्शियम व फॉस्फरस इत्यादी महत्वाच्या मूलद्रव्यांची कमतरता, गर्भाशयाचा दाह इत्यादी आजारांचे नेमके निदान करण्यात येवून त्यानुसार पुढील कालावधीत आवश्यक तो औषधोपचार करण्यात यावा.

कार्यवाहीचा टप्पा क्र.७ **निकृष्ट चारा सकस करणेबाबतचे प्रात्यक्षिक आयोजित करणे** - बरेच वेळा जनावरांसाठी सकस चारा उपलब्ध असतोच असे नाही. त्यासाठी शेतकऱ्यांकडे उपलब्ध असलेला निकृष्ट चारा सकस करण्यासाठी प्रात्याक्षिकाचे आयोजन करण्यात यावे. त्यामध्ये निकृष्ट चाऱ्यावर ४ टक्के युरिया द्रावणाचा वापर करून चारा सकस कसा करता येईल याचे प्रात्यक्षिक देण्यात यावे.

कार्यवाहीचा टप्पा क्र.८ **दुग्ध स्पर्धेचे आयोजन** - जनावरांचे संगोपन उत्तम पध्दतीने कसे करावयाचे याची माहिती पशुपालकांना व्हावी तसेच, ज्या पशुपालकांनी जनावरांचे संगोपन उत्तम पध्दतीने केले आहे त्यांना प्रोत्साहन मिळावे यासाठी दुग्धस्पर्धा व संकरीत वासरांच्या मेळाव्यांचे आयोजन करण्यात यावे. तसेच स्वच्छ दूध उत्पादन करण्यासाठी (Clean Milk Production) ध्वनी चित्रफिती दाखविण्यात याव्यात.

कार्यवाहीचा टप्पा क्र.९ **विशेष ग्राम सभा क्र.२ चे आयोजन** - दत्तक गावामध्ये दुसऱ्या ग्राम सभेच्या नियोजित दिनांकास आयोजन करावे. सदर सभेमध्ये दुधाळ जनावरांचे व्यवस्थापन, दुधाळ जनावरांचा आहार, शास्त्रोक्त पध्दतीचा गोठा, जनावरांमधील वंध्यत्व व त्यावरील उपाययोजना, मूलद्रव्यांची कमतरता, जनावरांमधील विविध आजार व उपाययोजना, (Feeding, Breeding & Management) याबाबत दृकश्राव्य माध्यमातून सर्व पशुपालकांना माहिती देण्यात यावी. तसेच सदर योजने अंतर्गत पशुपालकांनी व स्थानिक कर्मचाऱ्यांनी तो पर्यंत केलेल्या कामाचा आढावा घेण्यात यावा.

कार्यवाहीचा टप्पा क्र.१० **पाठपुरावा वंध्यत्व निवारण शिबीर आयोजित करणे** - प्रथम वंध्यत्व निवारण

उपचार केलेल्या जनावरांचा पाठपुरावा करण्यात येऊन जनावरांमध्ये काय सुधारणा झाली आहे याबाबतची नोंद घेण्यात यावी. तसेच मागील शिबीरांमध्ये कृत्रिम रेतन केलेल्या गाई, म्हशींपैकी किती गाई/म्हशी गाभण राहिली याचीही नोंद घेण्यात यावी व मागील शिबीरामध्ये उपचाराने सुधारणा न झालेल्या जनावरांची पुनश्च तपासणी करून निदानानुसार उपचार करण्यात यावेत.

- कार्यवाहीचा टप्पा क्र.११ विशेष ग्राम सभा क्र.३ चे आयोजन - पशुपालकांना वंध्यत्व असलेल्या जनावरांच्या रोग निदानाबाबत प्रयोगशालेय निष्कर्षांच्या आधारे परिपूर्ण माहिती करून देणे, हा या ग्राम सभेचा प्रमुख उद्देश राहील. त्याचप्रमाणे पशुपालकांच्या जनावरांचे व्यवस्थापन व इतर बाबींच्या संदर्भात शंका-निरसन इत्यादी कार्यक्रम या सभेमध्ये घेण्यात यावेत.
- कार्यवाहीचा टप्पा क्र.१२ वंध्यत्व निवारण शिबीर क्र.३ चे आयोजन - कायम स्वरूपाचे वंध्यत्व असणाऱ्या जनावरांबाबत त्या-त्या पशुपालकास स्पष्ट कल्पना देणे तसेच अजूनही तात्पुरते वंध्यत्व असलेल्या जनावरांना योग्य तो औषधोपचार करणे या बाबींचा अंतर्भाव सदर शिबीरामध्ये करण्यात यावा.
- वरील सर्व कार्यक्रमांचे आयोजन करताना शिबीरासाठी असलेल्या प्रचलित शासकीय दराने सेवाशुल्क आकारण्यात यावे.
- पशुसंवर्धन विभागाच्या अधिकारी व कर्मचाऱ्यांनी कामधेनू दत्तक ग्राम ही योजना विशेष आव्हान म्हणून स्विकारून मोहीम स्वरूपात (Mission Mode वर) राबवावी.
- योजनेचा प्रगती अहवाल सादर करणे - या योजने अंतर्गत सर्व कार्यक्रमांच्या टप्पेनिहाय अंमलबजावणीच्या आवश्यक त्या सर्व नोंदी ठेवून कार्यक्रम अंमलबजावणीच्या प्रत्येक टप्प्यानंतर तसेच दरमहा संबंधित जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद आणि जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त यांनी संबंधित प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन यांचेकडे योजनेचा प्रगती अहवाल सादर करावा. प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन यांनी त्यांचे विभागाचा सदर योजनेचा अहवाल संकलित करून दरमहा १० तारखेपर्यंत आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांना सादर करावा. आयुक्त पशुसंवर्धन यांनी या योजनेचा राज्याचा एकत्रित/संकलित अहवाल प्रत्येक महिन्याच्या १५ तारखेपर्यंत शासनास सादर करावा.
- योजना सुरू केल्यापासून आणि वरील सर्व कार्यक्रम नियोजनबध्द पध्दतीने राबविल्यानंतर म्हणजेच एकूण ६ महिन्यांच्या कालावधीनंतर योजना पूर्ण झाल्यानंतर सर्व दुधाळ जनावरांचे दूध उत्पादनाबाबत पुन्हा सर्वेक्षण करण्यात यावे व त्याच्या स्वयंस्पष्ट नोंदी कराव्यात. अशा रितीने योजना राबविल्यानंतर सदर दत्तक गावामध्ये दैनंदिन दूध उत्पादनामध्ये किती वाढ झाली, याची नोंद करावी.
- जिल्हा स्तरावरून सदर योजनेचा वेळोवेळी आढावा घेणे, अडीअडचणींबाबत मार्गदर्शन करणे, यासाठी कर्मचारी/अधिकारी तसेच निवडक पशुपालक यांचेशी संवाद साधून सदर योजना अधिक परिणामकारक होण्याच्या दृष्टीने आवश्यकतेनुसार दरमहा तालुका/जिल्हास्तरीय कार्यशाळांचे आयोजन करण्यात यावे.

३. कामधेनू योजनेसाठी निवड केलेल्या एका दत्तक गावाकरिता रू १,५२,५००/- च्या (रूपये एक लाख बावन्न हजार पाचशे फक्त) मर्यादेत खालील बाबींवर खर्च करण्यात यावा.

| अ.क्र. | बाब | खर्च मर्यादा |
|---|---|---|
| १ | जंतनाशण शिबीर | रू १७,५००/- |
| २ | खनिजद्रव्य मिश्रण व जिवनसत्व पुरवठा | रू १,००,०००/- |
| ३ | गोचिड गोमाशा निर्मुलन शिबीर | रू १५,०००/- |
| ४ | वंध्यत्व निवारण शिबीर | रू १५,०००/- |
| ५ | प्रसिध्दी व प्रचार | रू ५,०००/- |
| | एकूण | रू १,५२,५००/- |

४. सदर योजनेचे राज्य स्तरीय संस्थांसाठी कार्यान्वयीन अधिकारी जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त आणि जि परिषदेअंतर्गत संस्थांसाठी जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद हे राहतील. प्रादेशिक पशुसं सहआयुक्त हे विभागीय सनियंत्रण अधिकारी राहतील तर संपूर्ण राज्याकरिता अतिरिक्त आयुक्त पशुसं हे सनियंत्रण अधिकारी राहतील.

५. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास व मत्स्यव्यवसाय विभागाचे शासन निर्णय क्र.डीआर २००९/प्र.क्र.४३५/पदुम-४, दि. ५ मार्च, २०१० नुसार सदर योजने अंतर्गत औषधी खरेदी करण्य

सक्षम अधिकाऱ्यांची तांत्रिक मंजूरी घ्यावी, नियोजन विभागाचे शासन निर्णय क्र. जिवायो-१००७/प्र.क्र. ३९/का १४४४ दिनांक १६/२/२००८ नुसार सदर योजनेस जिल्हाधिकारी/जिल्हा परिषद यांची प्रशासकीय मान्यता प्राप्त करुन घ्यावी.

६. जिल्हा वार्षिक योजनेत निधी आरक्षीत करताना जिल्हा परिषदे अंतर्गत संस्थांसाठी ३१-सहाय्यक अनुदाने (वेतनेत्तर) या बाबी खाली तसेच राज्यस्तरीय संस्थांसाठी १३-कार्यालयीन खर्च, २१-साहित्य पुरवठा, ५२-यंत्रसामुग्री व साधनसामुग्री व १६-प्रसिध्दी व प्रचार या बाबी अंतर्गत निधी आरक्षीत करावा.

सदरचा शासन निर्णय सामान्य प्रशासन विभागाचे पत्र दिनांक २० ऑक्टोबर, २०१० अन्वये कळविल्यानुसार, बुधवार दिनांक १३ ऑक्टोबर, २०१० रोजी मंत्रालय, मुंबई येथे पार पडलेल्या मंत्रीमंडळ बैठकीत मंत्रीमंडळाने घेतलेल्या निर्णयान्वये निर्गमित करण्यात येत आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर उपलब्ध असून त्याचा संगणक सांकेताक २०१०१०२९१६१०५१००१ आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशाने व नावाने,

(डॉ. संजय वि. डोईजोडे)
अवर सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत

मा. मुख्यमंत्री यांचे प्रधान सचिव
मा. मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांचे खाजगी सचिव
विधानसभा/विधानपरिषद सदस्य (सर्व).
वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे **(५ प्रती)**
सर्व जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती
मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
महालेखापाल महाराष्ट्र-१/२ (मुंबई/नागपूर)
प्रादेशिक पशुसंवर्धन सहआयुक्त (सर्व)
जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त (सर्व)
जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी (सर्व)
जिल्हा नियोजन अधिकारी (सर्व)
जिल्हा दुग्धव्यवसाय अधिकारी (सर्व)
जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय (सर्व)
सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, तालुका लघु पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय (सर्व)
अवर सचिव (पदुम ३/१६), कृषि व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबई
कक्ष अधिकारी पदुम-१/१ अ, कृषि व पदुम विभाग,मंत्रालय,मुंबई
निवडनस्ती

---------

**जिल्हा वार्षिक योजने अंतर्गत (सर्वसाधारण योजना) कामधेनू दत्तक ग्राम ही योजना राबविण्यास प्रशासकीय मंजूरी प्रदान करणेबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, मत्स्यव्यवसाय विभाग,**
**शासन शुध्दीपत्रक क्र.नापुयो-२०१०/प्र.क्र.५०/पदुम-४,**
**मंत्रालय, मुंबई-४०० ०३२.**
**शिबीर कार्यालय, नागपूर**
**दिनांक : १६ डिसेंबर, २०११**

वाचा – १. कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, मत्स्यव्यवसाय विभागाचा शासन निर्णय क्र.नापुयो-२०१०/प्र.क्र.५०/पदुम-४, दि.२९.१०.२०१०.
२. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे कार्यालयीन पत्र क्र. एफवायपी-११(०९)/ सीआर-५८५/२००९-पसं-६, दि.१४.११.२०११.

**शासन शुध्दीपत्रक –**

कृषि, पशुसंवर्धन, दुग्धव्यवसाय विकास, मत्स्यव्यवसाय विभागाचा शासन निर्णय क्र.नापुयो-२०१०/प्र.क्र.५०/पदुम-४, दि.२९.१०.२०१० मधील पृष्ठ ३ वरील अ.क्र.३ येथील

३. कामधेनू योजनेसाठी निवड केलेल्या एका दत्तक गावाकरिता रू १,५२,५००/- (रूपये एक लाख बावन्न हजार पाचशे फक्त) च्या मर्यादेत खालील बाबींवर खर्च करण्यात यावा.

| अ.क्र. | बाब | खर्च मर्यादा |
|---|---|---|
| १. | जंतनाशन शिबीर | रू १७,५००/- |
| २. | खनिजद्रव्य मिश्रण व जिवनसत्व पुरवठा | रू १,००,०००/- |
| ३. | गोचिड, गोमाशा निर्मुलन शिबीर | रू १५,०००/- |
| ४. | वंध्यत्व निवारण शिबीर | रू १५,०००/- |
| ५. | प्रसिध्दी व प्रचार | रू ५,०००/- |
| | **एकूण** | **रू १,५२,५००/-** |

**च्या ऐवजी**

३. कामधेनू योजनेसाठी निवड केलेल्या एका दत्तक गावाकरिता रू १,५२,५००/- (रूपये एक लाख बावन्न हजार पाचशे फक्त) च्या मर्यादेत खालील बाबींवर खर्च करण्यात यावा.

| अ.क्र. | बाब | खर्च मर्यादा |
|---|---|---|
| १. | पशुपालक मंडळ स्थापन करणे व सहलीचे आयोजन करणे | रू ७,०००/- |
| २. | जंतनाशन शिबीर | रू १७,५००/- |
| ३. | खनिजद्रव्य मिश्रण व जिवनसत्व पुरवठा | रू ४०,०००/- |

परिषद, लातूर.
विभाग

| | | |
|---|---|---|
| ४. | गोचिड, गोमाशा निर्मुलन शिबीर | रू १३,०००/- |
| ५. | वंध्यत्व निदान व औषधोपचार शिबीर | रू २२,०००/- |
| ६. | वैरण विकास कार्यक्रम | रू १७,०००/- |
| ७. | निकृष्ठ चारा सकस करणे इ. | रू ५,०००/- |
| ८. | प्रसिध्दी व प्रचार | रू २१,०००/- |
| ९. | नाविन्यपूर्ण उपक्रम राबविणे | रू ५,०००/- |
| १०. | जनावरांचे मलमुत्र व वाया गेलेल्या चायाचे खत व्यवस्थापन करणे प्रशिक्षण व प्रात्यक्षिके | रू ५,०००/- |
| एकूण | | रू १,५२,५००/- |

असे वाचावे

**महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशाने व नावाने,**

**(डॉ.मा.ना. सवाईसोनकांबळे)**
**अवर सचिव, महाराष्ट्र शासन.**

प्रत,

१. मा. मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.
२. मा. उप मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव.
३. मा. मंत्री (पदुम) यांचे खाजगी सचिव
४. मा. राज्यमंत्री (पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय) यांचे खाजगी सचिव .
५. सर्व विधानसभा / विधानपरिषद सदस्य.
६. प्रधान महालेखापाल (लेखा परीक्षा)-१/२, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर.
७. प्रधान महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता)-१, महाराष्ट्र, मुंबई/नागपूर
८. प्रधान सचिव, वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई.
९. प्रधान सचिव, नियोजन विभाग, मंत्रालय, मुंबई.
१०. आयुक्त पशुसंवर्धन, महाराष्ट्र राज्य, पुणे (५ प्रती).
११. सर्व जिल्हाधिकारी तथा सदस्य सचिव, जिल्हा नियोजन समिती.
१२. सर्व जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी.
१३. सर्व प्रादेशिक सहआयुक्त पशुसंवर्धन.
१४. सर्व जिल्हा कोषागार अधिकारी.
१५. सर्व जिल्हा पशुसंवर्धन उपआयुक्त.
१६. सर्व जिल्हा पशुसंवर्धन अधिकारी, जिल्हा परिषद.
१७. सर्व जिल्हा नियोजन अधिकारी
१८. सर्व जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी.
१९. सर्व सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, जिल्हा पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय
२०. सर्व सहाय्यक आयुक्त पशुसंवर्धन, तालुका लघु पशुवैद्यकीय सर्वचिकित्सालय
२१. अवर सचिव, पदुम-३/कक्ष अधिकारी पदुम-१/१६, कृषि व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई.
२२. निवड नस्ती (पदुम-४)